**घोषणा**

संपादक : अजित सरदार

१२४३/२ आपटे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

दि.

स. न. वि. वि.

**घोषणा** मासिकाच्या वतीने आम्ही दरवर्षी महत्त्वाच्या एखाद्या विषयावर विशेषांक प्रसिध्द करत असतो. गेल्या १३ वर्षांमध्ये धार्मिक, सामाजिक, आर्थिक अशा अनेक विषयांवर विशेषांक प्रकाशित झाले आहेत. आजघडीला संपूर्ण समाजाला भेडसावणाऱ्या ' धर्म संस्कृती आणि परिवर्तन ' या विषयावर आम्ही विशेषांक काढत आहोत.

आपल्या देशाच्या ऐक्य व एकात्मतेच्या दृष्टीने सध्याचे वातावरण अतिशय चिंताजनक आहे. अनेक राज्यांमधून चळवळी उभ्या रहात आहेत व देशाच्या बाहेर फुटून निघण्याची भाषा करीत आहेत. या चळवळींची कारणमीमांसा आणि त्यांतून निर्माण झालेल्या परिस्थितीचे विश्लेषण करणारे; आणि त्यावरील उपाय-योजनांचा शोध घेणारे मान्यवरांचे लेख या अंकात असतील.

**घोषणा**च्या कार्य व स्वरूपाशी आपण परिचित आहात. बारा वर्षांच्या वाटचालीतून परिवर्तनाच्या चळवळीत '**घोषणा**'ने आपले एक स्थान निर्माण केले आहे. आजवरच्या प्रवासात आपला हातभार लागला तसाच यापुढेही लाभावा अशी विनंती आहे. या अंकात आपण एक जाहिरात देऊन हा अंक तसेच **घोषणा** प्रकाशनाचा एकूण उपक्रम यशस्वी करण्यास सहकार्य करावे ही विनंती. आपण आम्हाला निराश करणार नाही असा विश्वास वाटतो. सोबत दरपत्रक पाठवत आहोत. त्यापैकी शक्यतो अधिकाधिक मोठी जाहिरात देऊन हातभार लावावा. हा अंक दिवाळीच्या सुमाराला प्रसिध्द होईल.

कृपया आपला चेक ' संपादक, **घोषणा** ' या नावाने काढावा.

सहकार्याच्या अपेक्षेत,

आपले,

| | | |
|---|---|---|
| सुधा सरदार | शांताराम पंदेरे | अजित सरदार |
| प्रकाशक, घोषणा | कार्यवाह, युक्रांद | संपादक, घोषणा |